अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शनिवार
१७.१०.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

वर्ष: ०७ | अंक: २५८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712
+91 7745067712

## थोडक्यात

### अभिजीत दिपकेंना आज न्यायालयात हजर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** - दिल्लीतील कॅनॉट प्लेस येथील सेंट्रल पार्कमध्ये आयोजित 'लहरा दो तिरंगा' मोर्चापूर्वी दिल्ली पोलिसांनी कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना प्रतिबंधात्मक कारवाईअंतर्गत ताब्यात घेतले. त्यांना आज शनिवारी (दि.१७) विशेष कार्यकारी दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. दरम्यान, ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या अध्यक्षा नेहा बोरा यांची शनिवारी पहाटे सुटका करण्यात आली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या विरोधात आयोजित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली.

## दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवेवर भीषण अपघात

# खाटूश्यामजीच्या दर्शनासाठी निघालेल्या ८ भाविकांचा मृत्यू

### ९ गंभीर जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - शनिवारी सकाळी राजस्थानमधील कोटा जिल्ह्यात एक अतिशय दुर्दैवी घटना घडली. मध्य प्रदेशातील खातूश्यामजी मंदिराच्या दर्शनासाठी निघालेला एक भरधाव टेम्पो ट्रॅव्हलर दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवर २० फूट खाली ड्रेनेजमध्ये कोसळला. या भीषण अपघातात ८ भाविक जागीच व उपचारादरम्यान मृत्युमुखी पडले, तर ९ जण गंभीर जखमी झाले आहेत. या गाडीमध्ये एकूण २० प्रवासी होते. हे सर्वजण प्रामुख्याने मध्य प्रदेशातील बैतुल जिल्ह्याचे रहिवासी होते. हे सर्व भाविक खातूश्यामजी (सिकर जिल्हा, राजस्थान) येथील प्रसिद्ध मंदिराच्या दर्शनासाठी शुक्रवारी रात्री बैतुल येथून बाहेर पडले होते. सीमल्या पोलीस ठाण्याचे प्रभारी नंद सिंह यांनी सांगितल्यानुसार, वाहन 'कराडिया' टोल प्लाझा ओलांडून सुलतानपूरच्या दिशेने जात होते. यादरम्यान चालकाचे अचानक वाहनावरील नियंत्रण सुटले. गाडी वेगात असल्यामुळे थेट रस्त्यावरील दुभाजक (डिव्हायडर) तोडून २० फूट खाली असलेल्या कारेडच्या ओढ्यात/ड्रेनेजमध्ये जाऊन धडकली. धडक इतकी जोरदार होती की गाडीचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला.

मृतांचा आकडा आणि मदतकार्य हा अपघात शनिवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडला. या दुर्घटनेत ४ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर ३ जणांचा रुग्णालयात नेताना वाटेत प्राण गेला. नंतर मृतांचा आकडा वाढून ८ वर पोहोचला. अनेक प्रवासी वाहनातच अडकून पडले होते. चालकाला गाडी चालवताना डुलकी लागली असावी, ज्यामुळे हा अपघात घडला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. अपघाताची माहिती मिळताच आजूबाजूचे ग्रामस्थ आणि रस्तावरून जाणारे लोक मदतीसाठी धावून आले. त्यानंतर पोलीस, छकअख चे बचाव पथक आणि रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या. क्रेनच्या मदतीने अपघातग्रस्त वाहन बाहेर काढण्यात आले.

रुग्णालयात उपचार आणि नेत्यांची शोकसंवेदना या सर्व ९ गंभीर जखमींना कोटा मेडिकल कॉलेजच्या न्यू हॉस्पिटल आणि चइड रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अनेकांची प्रकृती अद्याप चिंताजनक आहे. या भीषण अपघाताबद्दल राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे.

## शाळकरी विद्यार्थ्यांची करामत

# यूट्यूबवर व्हिडीओ पाहून अल्पवयीन मैत्रिणीचा गर्भपात करण्याचा प्रयत्न, आरोपी अटकेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** - यूट्यूबवर व्हिडीओ पाहून अनेकजण नवनवीन गोष्टी शिकतात. मात्र, नागपुरात एका शाळकरी तरुणाने यूट्यूबवरील व्हिडीओ पाहून आपल्या अल्पवयीन मैत्रिणीचा घरीच गर्भपात करण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. गर्भवती असल्याचं समजल्यानंतर डॉक्टरांची मदत घेण्याऐवजी त्याने इंटरनेटवर गर्भपाताचे उपाय शोधले. मात्र, हा प्रयत्न अयशस्वी ठरला आणि मुलीने घरीच बाळाला जन्म दिला. या प्रकरणी पाचपावली पोलिसांनी १८ वर्षीय तरुणाला अटक केली असून, त्याच्यावर गुरूवारी (दि.१५) बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

**शाळेतच झाली होती दोघांची ओळख**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आणि आरोपी तरुण उत्तर नागपुरातील एकाच शाळेत शिकत होते. गेल्या वर्षी दोघांमध्ये जवळीक वाढली होती. आरोपीच्या घरी कुटुंबातील इतर सदस्य नसताना त्यांच्यात शारीरिक संबंध आल्याचं पोलिस तपासात समोर आलं आहे. त्यानंतरही आरोपीने मुलीसोबत शारीरिक संबंध ठेवले. तसंच, तिला लग्नाचं आश्वासनही दिल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे.

**गर्भधारणा समजताच यूट्यूबवर शोधले उपाय**

काही काळानंतर मुलीला आपण गर्भवती असल्याचं समजलं. तिने ही बाब आरोपीला सांगितली. मात्र, तिला रुग्णालयात नेण्याऐवजी त्याने यूट्यूबवर गर्भपातासंबंधी व्हिडीओ पाहण्यास सुरुवात केली. या व्हिडीओंच्या आधारे त्याने काही औषधी वनस्पतींची मिश्रणं तयार करून मुलीला दिल्याचा आरोप आहे. अनेक आठवडे तिला गर्भपाताची औषधंही देण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. मात्र, या प्रयत्नांमुळे गर्भपात झाला नाही.

# शिक्षकांना कुणी धमकवलं तर थेट माझ्याकडे तक्रार करा

## एसआयटी चौकशी केली जाईल : चंद्रशेखर बावनकुळेंचा कडक शब्दात इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***अमरावती*** - शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या निमित्त्याने शिक्षकांना धमकावण्याचे प्रकार होत आहे. अशी संस्था आणि तेथील व्यक्ती कितीही मोठी असली तरी त्यांना अजिबात सोडणार नाही. त्या संस्थेची एसआयटी चौकशी केली जाईल. धमक्या येत असेल तर शिक्षकांनी थेट माझ्याकडे तक्रार करावी, त्या तक्रारीची योग्य दखल घेतली जाईल, अशा शब्दात राज्याचे महसूल मंत्री आणि अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावतीत नाव न घेता अनेकांना इशारा दिला आहे.

महायुतीचे शिवसेना उमेदवार किरण सरनाईक यांच्या प्रचारार्थ वियज संकल्प मेळावा काल (शुक्रवारी) अमरावती येथील सांस्कृतिक भवन याठिकाणी आयोजीत करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.दरम्यान, यावेळी मंचावर उद्योग मंत्री उदय सामंत, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, कामगार मंत्री आकाश फुंडकर, माजी खासदार आनंदराव अडसूळ, खा. अनिल बोंडे, आ. संजय खोडके, आ. रवि राणा यांच्यासह पाचही जिल्ह्यातील महायुतीचे सर्व आमदार व प्रमुख पदाधिकारी हजर होते. पण, नार्कोटेस्ट झाली तर प्रत्येकाच्या मनात महायुतीच्याच उमेदवाराचे नाव असले पाहिजे,

अशातच, यावेळी मंत्री उदय सामंत म्हणाले की, महायुतीचे उमेदवार म्हणून किरण सरनाईक यांच्याकडून संवादात काही अडचण झाली असेल तर दिलगिरी व्यक्त करतो. व्यासपीठावर बसलेल्या प्रत्येकाच्या मनात काय आहे, हे सांगता येत नाही. पण, नार्कोटेस्ट झाली तर प्रत्येकाच्या मनात महायुतीच्याच उमेदवाराचे नाव असले पाहिजे, अशी अपेक्षा आहे. महायुतीचा धर्म पाळण्याची शपथ घेण्याचा आजचा दिवस असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# सैनिक बूट हाऊससह सब्जी भंडारला आग, लाखोंचे नुकसान

## शहरातील गांधी चौक परिसरातील घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** - शहरातील गांधी चौक परिसरात असलेल्या सैनिक बूट हाऊसला अचानक आग लागल्याने अंदाजे २५ लाखाचे तर बाजूलाच असलेल्या मा भवानी सब्जी भंडारला सुद्धा या आगीची झळ पोहचल्याने त्यांचे सुद्धा मोठे नुकसान झाले.

प्राप्त माहितीनुसार आज पहाटेच्या दरम्यान शहरातील गांधी चौक परिसरातील भाजी बाजार परिसरात सैनिक बूट हाऊस ला आग लागल्याने दुकानातील २० लाखांचा चप्पलचा माल आगीत जळून खाक झाला असून बाजूला असणाऱ्या माँ भवानी सब्जी भंडारला सुद्धा आग लागल्याने अंदाजे ५ लाखांचे नुकसान झाले आहे. ही आग सकाळी पहाटे लागल्याने नागरिकांना दिसून आली, आणि त्यामुळे तात्काळ वरुड अग्निशमन दलाल बोलाविण्यात आले, आग इतकी भयंकर होती की, ही आग विजविण्यासाठी वरुड आणि शे.घाट अशा एकूण ४ अग्निशमन दलाच्या गाड्या बोलाविण्यात आल्या.

सुदैवाने मध्यरात्री जर लागली असती तर संपूर्ण भाजी बाजार परिसरात आग पसरून ही आग नागरिकांना आढळून आल्याने मोठा अनर्थ टळला. ही आग मोठे नुकसान झाले असते, असे बोलल्या जात आहे. तर ही आग नेमकी कशी लागली? याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आली नसून या घटनेचा पंचनामा वरुड पोलीस करीत आहे.



**वरुड :** दुर्गामाता विसर्जन मिरवणुकीच्या अनुषंगाने अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्यासोबत मोर्शी-वरुड विधानसभा क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्था आणि सुरक्षा व्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा करताना आमदार चंदु उर्फ उमेश यावलकर.

